# कंदलगाव येथील जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत सायबर सुरक्षाचे मार्गदर्शन




दैनिक राजस्व
अशोक सोनकंटले

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन पुणे आणि जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमि क प्रशाला कंदलगाव येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी.एम. कमळे हे होते यावेळी संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सांगितले की, फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करावी. इतर व्हाट्सअप व सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉंग वापरून स्वतःची माहिती सुरक्षित करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप आदी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. या कार्यक्रम ासाठी जीवन ज्योत म ाध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील एकूण ३८२ विद्यार्थीनींनी आपला सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेचे प्राचार्य पी. एम. कमळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळेस जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमि क प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग आणि प्रशालेतील विद्यार्थ्यां बहुसंख्येने उपस्थित होते या कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन प्रशालेचे शिक्षक अनिल गावडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रशालेचे शिक्षक , अरूण गावडे यांनी मांडले.